पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक – २०७**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १०/०२/२०२१** **वेळ – दु.०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **१०/०२/२०२१** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.कलाटे राहुल तानाजी
५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
६. मा.कदम शशिकांत गणपत
७. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
८. मा.संतोष बबन कांबळे
९. मा.अभिषेक गोविंद बारणे
१०. मा.बुर्डे सुवर्णा विकास
११. मा.फुगे भिमाबाई पोपट
१२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१३. मा.सुलक्षणा राजू धर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारटणकर, मा.चितळे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.सवणे, मा.तांबे, मा.खाबडे, मा.लडकत – सह शहर अभियंता, मा.शिंदे, मा.दुर्वास, मा.देशमुख – सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पाटील – प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.इंगळे, मा.कुलकर्णी, मा.गलबले, मा.मोरे, मा.घुबे, मा.वाघुंडे, मा.काळे, मा.धुमाळ – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशु वैद्यकिय अधिकारी, मा.हराळे, मा.देशमुख, मा.पानसरे, मा.तावडे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.बहुरे, मा.कोळप – प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, मा.माने- लेखाधिकारी PMPML हे अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.५३) पिंपळे गुरव प्रभाग क्र.२९ मधील शेवंताबाई जगताप मनपा शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे.

विषय क्र.५४) मोशी कचरा डेपोतील जुन्या डंपींग केलेल्या कच-याची बयोमायनिंग करणे.

विषय क्र.५५) इ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवून कामकाज करणेसाठी आवश्यक डिझेलवर चालणारे ३ चाकी रिक्षा टेंपो वाहनचालकासह भाड्याने घेणेबाबत.

विषय क्र.५६) सन २०१९-२०२० या वर्षातील संचटलन तूट व विविध प्रकारचे पासेस पोटी रक्कम अग्रिम अदा करणेबाबत.

विषय क्र.५७) छत्रपती शिवाजी महाराज समाज प्रबोधन पर्व २०२१ विविध ठिकाणी प्रबोधनात्मक कार्यक्रम करणेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.५८) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगरसदस्यांचा माहे मार्च २०२१ मध्ये जम्मू व काश्मिर येथे आयोजित करणेत येणा-या अभ्यास दो-याच्या खर्चास मान्यता देणेबाबत. – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५९) ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले इमारतीतील दुस-या मजल्यावर उभारण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयाचे नावाबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६०) प्रशासन विभागाकडील वाहन वाटप धोरणामध्ये पदांचा समावेश करणेस मान्यता देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६१) महिला सबलीकरण कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६२) मे.पिक्सल मोशन अडव्हरटायजिंग पिंपरी या संस्थेस जाहिरात उभारणेस मान्यता देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६३) तुळापूर येथील श्री.छत्रपती संभाजी महाराज बलिदान स्थळाला अर्थसहाय्य देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६४) ड मुख्यालयातील सन २०१९-२०२० चे सुधारित व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकातील विशेश योजना या लेखाशिर्षकातील विकास कामांच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत.- मा.आरती चोंधे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६५) जुने तालेरा हॉस्पिटल पाडून नविन इमारत बांधणे या कामाच्या सुधारित खर्चास मान्यता मिळणेबाबत.- मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६६) वार्ड क्र.४ दिघी येथील आरक्षण क्र.२/१२२ मध्ये शाळा इमारत बांधणे याकामाच्या सुधारित खर्चास मान्यता मिळणेबाबत. मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव

----------

मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२०५) दि.२७/०१/२०२१ दु.२.३० वा. चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ८३६२ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – लेखा
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/०३/कावि/१७९/२०२०, दि.२१/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय PMPML संचालक यांचे मागणीनुसार ऑगस्ट २० पर्यंत एकूण तूट र.रु.१८३.५८ कोटी पैकी ४०% प्रमाणे र.रु.७३.४३ कोटीची मागणी केली आहे. नविन बस खरेदीसाठी सन २०२०-२१ मध्ये र.रु.९५.८३ कोटी एवढी तरतूद उपलब्ध असल्याने खास बाब म्हणून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर र.रु.४० कोटी (अक्षरी र.रु.चाळीस कोटी फक्त)सन २०२०-२१ च्या अपेक्षीत संचलन तूटीपोटी अग्रीम म्हणून अदा करावयाचे असल्यास शासन निर्णयामध्ये नमूद केल्या प्रमाणे पीएमपीएमएल ने त्यांच्या आर्थिक ताळेबंदाचे लेखापरिक्षण मनपाचे मुख्य लेखापरिक्षक यांच्या कडून संचलनतूट प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापि एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२० या कालावधीतील अहवाल प्राप्त झालेला नाही तरी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क)नुसार सन २०२०-२१ मधील तूटीमधून समायोजन करावयाच्या अटीवर संचलन तूटीची र.रु.४० कोटी(अक्षरी र.रु.चाळीस कोटी फक्त)अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६३ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/४६२/२०२०, दि.०२/११/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद

केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.74,11,410/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख अकरा हजार चारशे दहा फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व पुरवठादार मे.ब्राईट केटरिंग सर्व्हिसेस यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६४ विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/आ/२/कावि/३/२०२१, दि.१८/०१/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रिय कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पध्दतीने (पाण्याचे उच्चदाब फवा-यांच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी मे.महर्षी वाल्मिकी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. दि.१०/१२/२०२० पासुन ३ महिने किंवा नविन निविदा प्रक्रीया पुर्ण होण्याअगोदर जे अगोदर असेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ असुन त्याकरिता एकुण र.रू.८,२२,८८२/- (अक्षरी र.रू.आठ लाख बावीस हजार आठशे ब्याऐंशी फक्त) व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६५ विषय क्रमांक – ४

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – पशुवैद्यकीय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/०२/कावि/३३१/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पशुवैद्यकीय विभागाव्दारे शहरातील मोकाट भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित ठेवणेकरीता श्वान संतती नियमन शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविणेकामी या क्षेत्रात काम करणा-या तसेच ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांचेकडील नोंदणीकृत असलेल्या संस्थांची नेमणूक करणेस्तव ई-निविदा सुचना क्र.०८/२०१९-२०२० या निविदेतील पात्र संस्था तसेच सद्यस्थितीत कार्यरत संस्था अनुक्रमे १) मे.ॲनिमल वेलफेअर असोशिएशन, नवी मुंबई, २) मे.सोसायटी फॉर दि.प्रिव्हेशन ऑफ क्रुएल्टी टु ॲनिमल, लातुर व ३) मे.जेन्सी स्मीथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट, सातारा यांना र.रु.९९९/- प्रति श्वान (नर/मादी) इतक्या लघुत्तम दराने मा.स्थायी समिती सभेकडील ठराव क्र.५६७० दि.१८/०९/२०१९ अन्वये आदेश क्र.पवै/०२/कावि/३२/२०२० दि.१६/०१/२०२० रोजी कामकाज आदेश निर्गत करण्यात आले आहेत. सदर संस्थाच्या कामकाजाची मुदत दि.१६/०१/२०२० रोजी संपत असल्याने नविन संस्थांची २ वर्ष कालावधीकरीता नेमणुक करणेकामी ई-निविदा सुचना क्र.०२/२०२०-२१ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेचे निविदाधारक संख्या (Bids Submitted For Tenders) पाहिली असता एकुण चार निविदाधारकांनी सहभाग घेतल्याचे दिसुन आले. फक्त चार निविदाधारकांनी सहभाग

घेतल्याने त्याच्यांत पुरेशी स्पर्धा होत नसल्याने स्पर्धा होणेकामी दि.१२/०१/२०२१ दु.०३.०० वा. पर्यंत मा.अतिरिक्त आयुक्त (२) सो. यांचे मान्यतेने शुध्दीपत्रक प्रसिध्द करुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. नविन संस्था नेमणुकीकामी किमान १ महिना कालावधी लागणार आहे. उक्त तिन्ही संस्थाचे कामकाजाची मुदत दि.१६/०१/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने कामकाजाची निकड व तक्रारींची संख्या लक्षात घेता त्यांचे कामकाज बंद करणे शक्य नसल्याने तसेच नविन संस्थांची नेमणुक करणेकामी नमुद केलेनुसार किमान १ महिना किंवा अधिक कालावधी लागणार आहे. त्यामुळे कार्यरत तिन्ही संस्थांना नविन संस्थांची नेमणुक होईपर्यत सध्याच्या प्रचलित दराने म्हणजेच र.रु.९९९/- प्रतिश्वान (नर/मादी) यापुर्वीच्या करारनाम्याच्या अटी व शर्तीस अधिन राहुन १ महिना किंवा नविन संस्थांची नेमणुक होईपर्यत या कामकाजासाठी मुदतवाढ देणेस व या कामास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६६ विषय क्रमांक – ५
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.म.भां/१८/कावि/३६/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती साहित्य भांडर, आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील PMRD Covid Hospital यांनी दिलेल्या मागणीनुसार कोरोना रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक वैद्यकिय ऑक्सिजन द्रव गॅसचा $O_2$ पुरवठा मनपा अधिनियम कलम ६३(६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी संबंधीत उत्पादित कंपनी/ त्यांचे अधिकृत विक्रेते, अथवा अधिकृत पुरवठादार यांनी अल्प मुदतीची जाहिर सुचना क्रमाक १८/२०२०-२१ (Expression of Interest) नुसार लघुत्तम पुरवठाधारक मेें.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांचे र.रु.२४.५० (+जीएसटी) Per m3 rates साठी इतका खर्च अपेक्षित आहे. प्राप्त दर स्विकृत करुन मेें.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. त्यानुसार वैद्यकिय ऑक्सिजन द्रव गॅसचा $O_2$ पुरवठा करणेकामी र.रु.२४.५० (+जीएसटी) Per m3 rates या दराने ३ महिने कालावधीसाठी अंदाजे र.रु.२,४७,२०,६९६/- पर्यंतच्या खर्चास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रं.७४७८, दिनांक १६/०९/२०२० रोजी मान्यता दिली आहे. सदरची मुदत दि.११/१२/२०२० रोजी पुर्ण झाली आहे. तथापी खर्च र.रु.६०,३८,८२३/- एवढाच झालेला आहे. सदर PMRD Covid Hospital दिनांक १६/०१/२०२१ पासुन सध्यस्थितीत बंद करण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित शिल्लक र.रु.१,८६,८१,८७३/- मधुन मेें.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांचे दिनांक १२/१२/२०२१ ते दिनांक १५/०१/२०२१ पर्यंत र.रु.१४,३८,२३६/- एवढे बिल देय आहे. सदरची रक्कम मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिलेल्या र.रु.२,४७,२०,६९६/- मधुन अदा करता येईल. तथापी मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रं.७४७८, दिनांक १६/०९/२०२० अन्वये एकुण खर्चास मान्यता देताना दिनांक ११/१२/२०२० पर्यंत दिली असल्याने, फक्त दिनांक १२/१२/२०२० पासुन दिनांक १५/०१/२०२१ या कालावधीत मेें.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांना मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८३६७ विषय क्रमांक – ६

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – १) मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/४०/२०२१, दि.२७/०१/२०२१

२) मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे पत्र क्र.वैद्य/४/कालि/८०/२०२१, दि.१०/०२/२०२१

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत सुरू करणेत आलेले कोविड केअर सेंटर (सीसीसी) चे बंद करणेत आले नंतर उर्वरीत दिसांच्या अदायगी बाबत.

संदर्भ क्र.२ अन्वये विषय क्र.६ वरील विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६८ विषय क्रमांक – ७

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/२५/२०२१, दि.१८/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटोक्लस्टर येथील कोविड केअर सेंटर करिता, आरोग्य मुख्य कार्यालय व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील प्रस्तावित HDU करीता मा.आधिष्ठाता वायसीएम रुग्णालय यांनी दिलेल्या मागणीनुसार कोरोना रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक Fowler Beds मनपा अधिनियम कलम ६३(६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी संबंधीत उत्पादित कंपनी/ त्यांचे अधिकृत विक्रेते, अथवा अधिकृत पुरवठादार यांनी अल्प मुदत जाहीर सुचना क्रमांक १२/२०२०-२१ नुसार प्रसिध्दी देणेत आली होती. त्यानुसार प्राप्त दर प्रती नग र.रु.१३,८६०/- लघुत्तम प्राप्त झाले असुन हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४५ टक्केने कमी असल्याने तातडीची बाब विचारात घेता मनपा अधिनियम कलम ६३(६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार प्राप्त दर स्विकृत करुन वरील अधिनियम, कलम, कायद्यानुसार Fowler Beds खरेदीकामी मे.अरथॉन टेक्नोलॉजी अण्डँ इंटरप्राईजेस, चिंचवड यांना दर प्रती नग र.रु.१३,८६०/- प्रमाणे ६५ नगासाठी र.रु.९,००,९००/- कार्योत्तर पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहेत. त्यानुसार एकुण र.रु.९,००,९००/- चे खर्चास व संबंधीत पुरवठाधारकाशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६९ विषय क्रमांक – ८
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/२१/२०२०, दि.१८/०१/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटोक्लस्टर येथील कोविड केअर सेंटर करिता, आरोग्य मुख्य कार्यालय व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील प्रस्तावित HDU करीता मा.आधिष्ठाता वायसीएम रुग्णालय यांनी दिलेल्या मागणीनुसार कोरोना रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक Fowler Beds मनपा अधिनियम कलम ६३(६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी संबंधीत उत्पादित कंपनी/ त्यांचे अधिकृत विक्रेते, अथवा अधिकृत पुरवठादार यांनी अल्प मुदत जाहीर सुचना क्रमांक-१२/२०२०-२१ नुसार प्रसिध्दी देणेत आली होती. त्यानुसार प्राप्त दर प्रती नग र.रु.१३,८६०/- लघुत्तम प्राप्त झाले असुन हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४५ टक्केने कमी असल्याने तातडीची बाब विचारात घेता मनपा अधिनियम कलम ६३(६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार प्राप्त दर स्विकृत करुन वरील अधिनियम, कलम, कायद्यानुसार Fowler Beds खरेदीकामी मे.रेखा इंजिनिअरींग, चिंचवड यांना दर प्रती नग र.रु.१३,८६०/- प्रमाणे ५० नगासाठी र.रु.६,९३,०००/- कार्योत्तर पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहेत. त्यानुसार एकुण र.रु.६,९३,०००/- चे खर्चास व संबंधीत पुरवठाधारकाशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७० विषय क्रमांक – ९
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/२४/२०२१, दि.१८/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना या विषाणूचा सर्वत्र फैलाव झालेला असल्याने त्याचा प्रादुर्भाव पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये पसरत असल्याने ऑटो क्लस्टर येथील कोविड रुग्णालयातील $O_2$ बेडकरीता भारतीय साथरोग अधिनियम १८९७ आपत्ती व्यस्थापन कायदा २००५ कलम ४१, ५० व महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) नुसार व कलम ६७(३)(क) नुसार मे.रुबी अलकेअर सर्व्हिस प्रा.लि., पिंपरी यांनी अति तातडीने पुरवठा केलेल्या आवश्यक साहित्य Semi Fowler Beds खरेदी करणेकामी त्यांचेकडील प्राप्त दर प्रति नग र.रु.१०,१२५/- ने एकुण १५० नगाकरीता र.रु.१५,१८,७५०/-(अक्षरी र.रु.पंधरा लाख अठरा हजार सातशे पन्नास फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने खरेदी खर्चास कार्योत्तर मान्यता व त्यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७१ | विषय क्रमांक – १०
दिनांक – १०/०२/२०२१ | विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/१०५/२०२१, दि.०१/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.34/38/2020-2021 अन्वये प्रभाग क्र.११ मधील पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रिडासंकुलाची उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एस के भोसले कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.29,96,702/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख शहान्नव हजार सातशे दोन फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,75,052/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,75,052/- पेक्षा 28.84% कमी म्हणजेच र.रु.21,17,047/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,541/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.21,650/- = एकुण र.रु.21,42,238/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७२ | विषय क्रमांक – ११
दिनांक – १०/०२/२०२१ | विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/१०४/२०२१, दि.०१/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.41/09/2020-2021 अन्वये प्रभाग क्र.11 मधील फुलेनगर कृष्णानगर पुर्णानगर व इतर परिसरात फुटपाथ व नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एस.के.भोसले कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.44,97,040/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख सत्त्यान्नव हजार चाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,81,340/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,81,340/- पेक्षा 30.84% कमी म्हणजेच र.रु.30,99,295/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.565/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.15,700/- = एकुण र.रु.31,15,560/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७३ विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/७८/२०२१, दि.२८/०१/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 7) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७४ विषय क्रमांक – १३

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/७२/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 17) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७५ विषय क्रमांक – १४

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य BRTS

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/१०७/२०२१, दि.०२/०२/२०२१

विषय - निगडी-दापोडी या बीआरटीएस कॉरीडॉर वरील डेडीकेटेड लेनची व बस स्टॉपची दुरुस्ती अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.१४ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७६ विषय क्रमांक – १५

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य उद्यान

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/कावि/३०/२०२०, दि.०२/०२/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ(१ ते ६) मधील

कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेशनिर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७७ विषय क्रमांक – १६
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/३४/२०२१, दि.०२/०२/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

ऑटो क्लस्टर येथील कोवीड केअर सेंटर करिता कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधतात्मक उपाय योजना करणेकामी आवश्यक साहित्य खरेदीकामी अल्प मुदतीची जाहिर सूचना क्र.28/2020-21 अन्वये दर पत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, चिंचवड यांचे बाब क्रं 01, 02, 03 व 05 असे एकुण 04 बाबी करिता एकुण र.रु.7,37,576/- इतके लघुत्तम दर प्राप्त झालेले सदरचे दर दिनांक 22/10/2020 रोजीच्या प्रस्तावान्वये स्विकृत करणेस मंजुरी देणेत आलेली आहे. एकुण र.रु.7,37,576/- (अक्षरी र.रू.सात लाख सदोतीस हजार पाचशे शहात्तर फक्त) मध्ये एकुण 04 बाबी खरेदी करणेचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७८ विषय क्रमांक – १७
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/१/कावि/९३/२०२१, दि.०३/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.अप्पर तहसिलदार, पिंपरी चिंचवड ता.हवेली जि.पुणे यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.जमिन/कावि/५१/२१ दि.१२/१/२०२१ च्या अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील किवळे/रावेत, चिंचवड, पिंपरी वाघेरे, सांगवी, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, पिंपळेगुरव, भोसरी, दापोडी, आकुर्डी, निगडी येथील धारण केलेल्या जमिनीवरील अकृषिक सारा आकारणीची गावानिहाय थकबाकीची र.रु.१,७७,६५,०४७/- ची मागणी नोटीस दिलेली आहे. मा.जिल्हाधिकारी सो. जि. पुणे यांनी दि.२८/१/२०२१ रोजी मा.आयुक्त सो यांचे बरोबर समक्ष झालेल्या चर्चेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गावांच्या आकृषिक आकारणीची र.रू.१,७७,६५,०४७/- त्वरीत अदा करणे बाबत कळविले आहे. तरी अकृषिक बिनशेतसारा र.रु.१,७७,६५,०४७/- शासनास अदा करणेकामी व जमिन महसुल बिनशेतसारा या लेखाशिर्षावर तरतुद कमी पडत असल्याने, हॉकर्स या लेखाशिर्षावरुन र.रु.१,८०,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी ऐंशी लाख फक्त) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३७९ विषय क्रमांक – १८

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – नगरसचिव

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.नस/२/कावि/२३/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.संयोजक, महाराष्ट्र महापौर परिषद, व मानद संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांचेकडील पत्र क्र. महाराष्ट्र महापौर परिषद/०४/२०२१, दि.१८/०१/२०२१ नुसार महाराष्ट्र महापौर परिषदेची सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ करीता वार्षिक वर्गणीची र.रु.६०,०००/- (अक्षरी र.रु.साठ हजार फक्त) महाराष्ट्र महापौर परिषद यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८० विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/११५/२०२१, दि.०३/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.37/02/2019-20 अन्वये प्रभाग क्र.७ भोसरी मध्ये करसंकलन इमारती शेजारील मनपाच्या ताब्यातील जागेमध्ये बहुउद्देशीय हॉल बांधणेकामी लघुत्तम ठेकेदार मे.हिरेन कन्स्ट्रक्शन कंपनीचे मालक यांचे निधन झालेने द्वितीय लघुत्तम ठेकेदार मे.अतुल आर.एम.सी. यांना कामकाज देणे आले होते. तथापि मे.अतुल आर.एम.सी. यांना आदेश क्र.स्था/नि/इमुख्य/२२५/२०२०, दिनांक १६/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेणेस प्रतिबंध करणेस व ३ वर्षाकरीता काळ्या यादीत समाविष्ट करणेचे आदेश निर्गत झाले आहेत.सदर कामासाठी मा.आयुक्तसो यांचे दिनांक २५/०१/२०२१ चे मान्य प्रस्तावान्वये तृतीय लघुत्तम ठेकेदार मे.पी.एन. नागणे यांना निविदेसाठी यापूर्वी मंजूर केलेल्या दरात म्हणजेच ५.१५% कमी दरात काम करणेस तयार आहात का याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याच दरात काम करणेची तयार दर्शविली आहे.मे.पी.एन.नागणे नि.र.रू.3,25,89,672/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पंचवीस लाख एकोणनव्वद हजार सहाशे बहात्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,23,28,003/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,23,28,003/- पेक्षा 5.15% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 5.93% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.3,06,63,111/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,02,819/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.58,850/- = एकुण र.रु.3,09,24,780/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८३८१ विषय क्रमांक – २०

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे पत्र क्र.हक्षेका/लेखा/कावि/०७/२०२१, दि.०३/०२/२०२१

मा.कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते २) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठोकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८२ विषय क्रमांक – २१

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/६१/२०२१, दि.२२/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध विकास कामे सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. मा.शहर अभियंता सो. यांचे दालनात दि.१८/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांची नियुक्ती करणेकरिता आवश्यक असलेली दरपत्रके मागविणेकरिता कोटेशन नोटीस इकडील विभागामार्फत मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.३०/१२/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली होती.या विभागाकडून संगणक विभागाला कोटेशन नोटीस प्रसिध्द करणेकामी पाठविलेल्या इ–मेल ची प्रिंट व कोटेशन नोटीस सोबत जोडली आहेत. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक या विभागाकडे सादर करण्याची अंतिम दिनांक ०५/०१/२०२१ होती. सदर कोटेशन नोटीस च्या अनुषंगाने इकडील विभागास विविध प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत.दि.२२/०१/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्यात आली असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.त्यातील लघुत्तम दर (जीएसटी वगळता) सादर केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या कामाकरिता नेमणूक करणेबाबतचा खालील प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | एकक | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नाव | प्राप्त दर (%) (जी.एस.टी.शिवाय) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदा पूर्व कामाकरिता | निविदा पश्चात कामाकरिता | एकूण |
| १ | प्रभाग क्र.११ मधील पूर्णानगर परिसरातील राघवेंद्र हॉटेल ते नक्षत्र फेज १ पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | % प्रती काम | मे.पेव्हटेक कन्सलटंट | ०.७४ | १.०० | १.७४ |
| २ | प्रभाग क्र.११ मधील से.क्र.२० येथील कृष्णानगर मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे | % प्रती काम | मे.पेव्हटेक कन्सलटंट | ०.७६ | १.०० | १.७६ |

तरी उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे विकास कामांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत तसेच त्याकामी देय असलेली फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८३ विषय क्रमांक – २२
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/२५३/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.20/10/2020-21 अन्वये प्रभाग क्र.८ मधील से.नं.१,२,३ व इतर ठिकाणच्या रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.एम.पी.धोत्रे कन्स्ट्रक्शन नि.र.रू.56,24,660/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख चोवीस हजार सहाशे साठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,50,910/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,50,910/- पेक्षा 38.05% कमी म्हणजेच र.रु.34,38,789/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.36,206/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.35,48,745/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८४ विषय क्रमांक – २३
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/२५४/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.20/11/2020-21 अन्वये प्रभाग क्र.८ मधील से.नं.४,५,६ व इतर ठिकाणच्या रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.एम.पी.धोत्रे कन्स्ट्रक्शन नि.र.रू.56,22,398/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख बावीस हजार तीनशे अठ्ठयान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,48,648/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,48,648/- पेक्षा 38.05% कमी म्हणजेच र.रु.34,37,387/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.36,190/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.35,47,327/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली

वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८५ विषय क्रमांक – २४
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/२५५/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.44/1/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ नेहरुनगर पिंपरी येथील हिंदुस्थान एन्टीबायोटिक्स कंपनीच्या जागेतून नाला बांधणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.1,71,59,829/- (अक्षरी र.रु.एक कोटी एक्काहत्तर लाख एकोणतीस हजार आठशे एकोणतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,71,29,829/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,71,29,829/- पेक्षा 30.66% कमी म्हणजेच र.रु.1,18,77,823/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,534/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.30,000/- = एकुण र.रु.1,19,11,357/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८६ विषय क्रमांक – २५
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२६०/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.37/7/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२ मधील साई जीवन शाळे शेजारील मैदान विकसित करणेकामी नि.र.रू.5,80,42,913/- (अक्षरी र.रु.पाच कोटी ऐंशी लाख बेचाळीस हजार नऊशे तेरा फक्त) लघुत्तम १ ठेकेदार मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांची निविदा, निविदा अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस ठराव क्र.6806 दि.28/02/2020 अन्वये मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिली आहे. तथापि, मा.आयुक्तसो यांचेकडील आदेश क्र.स्था/नि/इ मुख्य/220/२०२० दि.16/12/2020 अन्वये मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांना काळया यादीत समाविष्ट करुन सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेणेस ३ वर्षासाठी प्रतिबंध करणेस आदेश निर्गमित करणेत आले आहे तसेच लघुत्तम २ ठेकेदार लघुत्तम १ यांचे दरात काम करणेची संमती असल्यास त्यांची निविदा स्वीकृत करणेस मा.आयुक्तसो यांचेकडील दि.16/12/2020 चे प्रस्तावान्वये आदेशित केले आहेत. त्यामुळे मे.वैदही

कन्स्ट्रक्शन यांची निविदा रद्द करुन लघुत्तम २ ठेकेदार मे.यशक असोसिएट्स यांनी लघुत्तम १ ठेकेदार यांचे दरात काम करणेस संमती दिली असल्याने लघुत्तम २ ठेकेदार मे.यशक असोसिएट्स याची निविदा मंजूर करणेस प्रस्तावित करणेत येत आहे. नि.क्र.37/7/2019-20 अन्वये प्र.क्र.२ मधील साई जीवन शाळे शेजारील मैदान विकसित करणेकामी नि.र.रू.5,80,42,913/- (अक्षरी र.रु.पाच कोटी ऐंशी लाख बेचाळीस हजार नऊशे तेरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.5,70,20,820/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम मे.यशक असोसिएट्स यांचेकडून र.रु.5,70,20,820/- पेक्षा 5.25% कमी दराने निविदा प्राप्त झाली आहे. सन २०१८-१९ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा 5.29% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.5,40,27,227/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,73,093/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.3,49,000/- = एकुण र.रु.5,50,49,320/- (अक्षरी र.रू.पाच कोटी पन्नास लाख एकोणपन्नास हजार तीनशे वीस फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८७ विषय क्रमांक – २६

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/६७/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा सूचना क्रमांक ०५/२०२०-२१ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.टेक नाईन सर्व्हिसेस यांना आदेश दिनांका पासुन एक वर्षाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अधिकारी/ कर्मचारी यांची बायेमेट्रिक पद्धतीने हजेरी नोंदविणेकामी आवश्यक असणारी बायोमेट्रीक फेस रिडींग व फिंगर प्रिंट मशिन देखभाल दुरुस्ती करणेचे कामकाज अंदाजपत्रकीय दरांपेक्षा -२.४७% ने कमी दराचे र.रू.१६,८९,४४०/- (अक्षरी र.रू.सोळा लाख एकोनव्वद हजार चारशे चाळीस फक्त) अधिक वस्तु व सेवा कर देणेकामी त्यांचेसोबत केलेल्या कामाचा करारनामा व कामकाजाचे आदेश क्र.मातवि/११/ कावि/१८५/२०२० दि.०६ नोव्हेंबर २०२० अन्वये निर्गत करण्यात करण्यात आलेले असल्याने कामकाजाचा करारनामा अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८८ विषय क्रमांक – २७

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ–मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/१२/कावि/४२/२१, ०४/०२/२०२१

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा सूचना क्रमांक ०६/२०२०-२१ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.इंदू इन्फोटेक सोल्युशन्स यांना महानगरपालिका मुख्य कार्यालय व इतर विविध कार्यालयातील संगणकीय केबल नेटवर्क करणेबाबतचे कामकाज दोन वर्षकालावधी करीता देण्यात आलेले आहे. त्यासाठी येणा-या एकूण र.रू.१७,०३,२३५/- (अक्षरी र.रू.सतरा लाख तीन हजार दोनशे रस्तीस फक्त) (सर्व करासहित) अंदाजपत्रकीय दरापेक्षा -३१.७५०% ने कमीचे दराने करारनामा करणेत आलेला असल्याने करारनामा अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३८९ विषय क्रमांक – २८

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.कृचिंपास्पपकें/१०/कावि/१३/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे ब क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणारे पु.ल.देशपांडे सार्वजनिक वाचनालय, केशवनगर, चिंचवड-३३ हे वाचनालय मराठी देशा फाऊंडेशन, वाकड पुणे यांना ११ महिन्याचे कराराने र.रू.१०,०००/- प्रतीमहा मानधनावर चालविण्यास देण्यात आले आहे.मा. महापालिका सभा ठराव क्र.६२७ दि.१०/०२/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या सर्व प्रभागातील सार्वजनिक वाचनालये त्या त्या प्रभागातील जेष्ठ नागरिक संघ, महिला बचत गट /संस्था यांचेकडे चालविण्यास देण्यास मान्यता घेण्यात आलेली आहे. मा.क्षेत्रिय अधिकारी,ब क्षेत्रिय कार्यालय, चिंचवड यांनी आदेश क्र.चिं.स्प.प.कें./१०/२६/२०२०, दि.१०/०८/२०२० अन्वये मनपाचे पु.ल. देशपांडे सार्वजनिक वाचनालय मराठी देशा फाउंडेशन या संस्थेस दि.०१/०१/२०२० ते दि.३०/११/२०२० अखेर ११ महिने मुदतवाढ देऊन प्रति माह र.रू.१०,०००/- मानधनावर करारनाम्यातील अटी शर्तीनुसार चालविण्याकामी मुदतवाढ देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यांची मुदत दि. ३०/११/२०२० अखेर संपुष्टात आली आहे. मराठी देशा फाउंडेशन या संस्थेने दिनांक १८/१२/२०२० चे पत्रान्वये पु.ल. देशपांडे सार्वजनिक वाचनालय चालविण्यास ५५ महिने मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली आहे. मराठी देशा फाऊंडेशन या संस्थेने पा.क्र.C/१३७०, दि.०१/१२/२०१८ अन्वये भरणा केलेली र.रू.२०,०००/- ची अनामत रक्कम मनपाकडे ठेऊन सेवाशुल्क तत्वावर दरमहा र.रू.१०,०००/- चे मानधन घेऊन म.न.पा.च्या सार्वजनिक वाचनालयांच्या नियम व अटीशर्तीनुसार वाचनालय चालविण्यास ११ महिन्यांची मुदतवाढ घेण्याचे मान्य केलेले आहे. पु.ल.देशपांडे सार्वजनिक वाचनालय मराठी देशा फाऊंडेशन या संस्थेस सार्वजनिक वाचनालयांच्या नियम व अटीशर्तीनुसार चालविण्याकामी ११ महिन्यांची (दि.१/१२/२०२० ते ३१/१०/२०२१) मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८३९० विषय क्रमांक – २९

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/७३/२०२१, दि.०५/०२/२०२१

विषय - सन २०१८-१९ साठी जलक्षेत्र क्र.बी/५ अंतर्गत वाल्हेकरवाडी येथे स्पाईन रोड लगत डिझाईन प्रमाणे डी.आय वितरण नलिका पुरविणे व टाकणेबाबत.

विषय क्र.२९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९१ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ– मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/६३/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.३०/४७-२०२०-२१ अन्वये मुंबई पुणे रस्त्यावरील बसस्थांनकावरील वाहतूक नियंत्रक दिव्यांचे देखभाल, दुरुस्ती करणे व तद्अनुषंगिक कामे करणे (2020-23) मे.जे.पी.ट्रफिक ॲटोमेशन प्रा.लि. नि.र.रू.४४,६४,२२२/-(अक्षरी र.रू.चव्वेचाळीस लाख चौसष्ट हजार दोनशे बावीस फक्त) पेक्षा १५.५०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९२ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ– मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/६४/२०२१, दि.०४/०२/२०२१

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.३०/४८-२०२०-२१ अन्वये मुंबई पुणे महामार्गावरील वाहतूक नियंत्रक दिव्यांचे चालन व देखभाल, दुरुस्ती करणे व तद अनुषंगिक कामे करणेकामी (सन २०२०-२३) मे.जे.पी.ट्रफिक ॲटोमेशन प्रा.लि. नि.र.रू.४४,६३,६६७/- (अक्षरी र.रू. चव्वेचाळीस लाख त्रेसष्ठ हजार सहाशे सदुष्ट फक्त) पेक्षा १७.५०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९३ विषय क्रमांक – ३२
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षेका/१/कावि/१५५/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बालेवाडी क्रीडा संकुल मधील खेळाडुंचे वसतीग्रह येथील इमारती मधील A, B, C ह्या तीन इमारती कोविड केअर युनिटसाठी वापरल्या आहेत. त्यामुळे काही इमारती व क्रीडा संकुलनातील इमारती पुणे मनपाने कोविड केअर युनिटसाठी वापरल्या आहेत. बालेवाडी क्रीडा संकुलनाचे वीज वापराचे बिल भरणे बाबत क्रिडा व युवक सेवा संचनालय, मा.आयुक्त शिवछत्रपती क्रिडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी कडील पत्र क्रमांक क्रीयुसे/कोविसा/इलेक्ट्रक/२०२०-११/२३४ दि.१७/०८/२०२० नुसार विज बिला पोटी माहे एप्रिल २०२० ते जुलै २०२० अखेर एकुण र.रू.७३,१४,३८०/-इतकी रक्कम भरणे बाबत विनंती केली आहे. सदर कालावधीत बालेवाडी क्रीडा संकुल पिंपरी चिंचवड मनपा व पुणे मनपा यांनी कोविड -१९ साठी सामुदायीक रित्या वापरले असल्याने एकुण विजबीलाच्या ६० % पुणे मनपा व ४०% रक्कम पिंपरी चिंचवड मनपा मार्फत अदा करणेबाबत मा.आयुक्त यांनी दिनांक ०६/०१/२०२१ रोजी चे मंजुर प्रस्तावा नुसार मान्यता दिली आहे त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगर पालिके मार्फत माहे एप्रिल २०२० ते जुलै २०२० अखेर एकुण विजबीलाच्या ४०% रक्कम र.रू.२९,२५,७५२/- इतकी रक्कम मा.डायरेक्टर स्पोर्टस् अन्ड युथ सर्विसेस सिंकिंग फंड शिवछत्रपती क्रिडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी यांना मनपाने अदा करणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९४ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/९४/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका "इ" प्रभाग अंतर्गत पाणी पुरवठा टाक्या व संप या शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील अविभाज्य घटक आहेत. प्रभागातील नागरिकांना याच टाक्या मधून नियमित पाणीपुरवठा केला जातो. सदर टाक्या सतत कार्यरत असल्यामुळे व शुद्धीकरण प्रक्रियेमध्ये वापरात येणा-या रसायनमुळे, या टाक्यांची झीज होऊन दिवसें दिवस कमकुवत होत आहेत. सदर टाक्यांपैकी काही टाक्या, जुन्या, जीर्णवना दुरुस्त अवस्थेत असल्याचे दिसून येते. तसेच संभावित धोक्यापासून संरक्षित करण्याकरिता स्ट्रक्चरल ऑडिटर यांचेमार्फत संरक्षणात्मक परीक्षण करणे आवश्यक आहे. स्थापत्य विभागाकडे अशा प्रकारचे संरक्षणात्मक परीक्षणचे मनपा आयुक्त मान्य स्वाक्षरी कृत दरसूची सुद्धा उपलब्ध आहे. त्यानुसार "इ“ प्रभाग कार्यक्षेत्रातील सोबतच्या प्रपत्रात (तक्ता अ) नमूद केलेल्या टाक्यांचे संरक्षणात्मक परीक्षण(Structural Audit) करिता मान्य केलेल्या सूचीतील परिशिष्टक नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.४०८० दि.१०/०९/२०१३ अवन्ये मान्यता प्राप्त

स्ट्रक्चरल ऑडिटर पॅनेलमध्ये मे.के. बी.पी.सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा सल्लागार म्हणून समावेश आहे. तसेच त्यांच्यामार्फत पुणे, पिं.चिं. म.न.पा. आणि राज्य व केंद्रसरकारच्या विविध विभागातील इमारती व उंचपाण्याच्या टाक्यांच्या तसेच जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या संरक्षणात्मक परीक्षणाचे कामे केलेले आहेत. मे.के.बी.पी.सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना संबंधित काम करणेबाबत विचारणा केली असता वरील विषयांकित काम करणेस त्यांनी तयारी दर्शविली आहे. तरी वर नमूद केलेल्या उंच पाण्याच्या टाक्यांचे संरक्षणात्मक परीक्षण (Structural Audit) करणे आवश्यक असून याकामी मे.के.बी.पी.सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची याकामासाठी नेमणूक करून त्यांना कामाचा आदेश देणे व प्रस्तावात नमूद प्रमाणे म.न.पा.च्या मान्य दरसूचीनुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९५ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/७७०/२०२०, दि.२४/१२/२०२०

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मे.सी.व्ही.कांड कंस. यांनी दि.४/११/२०२० रोजीचे पत्र आवक क्र.१२७९ दि.२१/०५/२०१९ अन्वये "कोरोना" (कोविड-१९) महामारीमुळे जाहीर झालेल्या टाळेबंदीमुळे प्रभाग क्र.११ मधील मंजूर विकास योजनेतील ताब्यात आलेले रस्ते विकसित करणे या प्रकल्पाचा वाढलेला कालावधी व प्रकल्पाकरिता देय असलेले निविदापश्च्यात निश्चित शुल्क या सर्व बाबींचा विचार करता त्यांनी सदर प्रकल्पावर यापुढे काम करणेस असमर्थता दर्शविली आहे व महाराष्ट्र शासनाकडील परिपत्रक क्र.संकीर्ण १०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२ दि.२९/०६/२०२० ला अनुसरून "कोरोना" (कोविड-१९) महामारीमुळे जाहीर झालेली टाळेबंदी हि "दैवी प्रकोप" (Force Majeure Event ) असलेने निविदा अटी व शर्थी मधील कलम २.७ (Force Majeure) प्रमाणे करारनामा आहे त्या परिस्थितीत समाप्त करून सदर प्रकल्पाच्या "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" या जबाबदारीतून मुक्त करणे तसेच प्रकल्पाची महत्वपूर्ण कागदपत्रे, नकाशे व आराखडे इ. इकडील कार्यालयात दाखल करून घेणेस तसेच सदरचा प्रकल्प महत्वपूर्ण असलेने व विहित वेळेत पूर्ण करणेचे दृष्टीने तांत्रिकदृष्टया आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे, प्रकल्पाचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे , मोजमापे तपासणे व देयके तयार करणे इ. करिता " प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार " यांची नेमणूक करणे आवश्यक आहे .सदर रस्ते बांधकाम क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती / फर्म मे.कावेरी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंस. यांना समक्ष सदर प्रकल्पाचे उर्वरित कामाकरिता " प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार " म्हणून काम करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी काम करणेची तयारी दर्शविली आहे. त्यानुषंगाने मे.सी.व्ही.कांड कंस. यांची सदर कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून केलेली नियुक्त रद्द करून त्यांचे जागी मे.कावेरी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंस. यांची नवीन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पदी नेमणूक करणे व सदर कामाकरिता देय असलेल्या एकूण फी (निविदा स्वीकृत रकमेच्या १.७४%) मधून मे.सी.व्ही.कांड कंस. यांना निविदा पूर्व कामाकरिता अदा केलेली ०.७४% फी व निविदापश्च्यात कामाकरिता अदा केलेली ०.१०% फी वजा करता उर्वरित

असलेल्या ०.९०% फी मध्ये मे.कावेरी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंस. यांची निविदापश्च्यात प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कामाकरिता ०.९० % फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९६ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.उप आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/८१/२०२१, दि.०२/०२/२०२१

मा.उप आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक जंतुनाशक/दुर्गधीनाशक काळे फिनेल ग्रेड 1 RWC -18 व सेंटेड फिनेल क्रॉन्सट्रेट खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.20-02/2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.श्रीराम ॲग्रो एजन्सी,अमरावती यांचे एकुण 02 बाबीसाठी दर र.रु.**9,56,530/-** कमी करून दिलेले असुन कमी करून दिलेले दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.**9,74,700/-** पेक्षा 1.86% ने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९७ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.उप आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/८२/२०२१, दि.०२/०२/२०२१

मा.उप आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक जंतुनाशक/दुर्गधीनाशक ॲसिड 33 टक्के **HCL-5/10 LTR CAN** मध्ये खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.20-03/2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.श्रीराम ॲग्रो एजन्सी, अमरावती यांचे एकुण 01 बाबीसाठी दर र.रु.90,538/- नुसार 01 बाबीसाठी एकुण र.रु.90,538/- प्राप्त झाले असुन प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.90,538/- पेक्षा 3.33% कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९८ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/८२/२०२१, दि.०३/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक जंतुनाशक/दुर्गंधीनाशक कार्बोलिक 5 टक्के डी.पी.पावडर खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.20-05/2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.लक्ष्मी केमी लाईम पेस्ट कंन्ट्रोल पुणे यांचे एकुण 01 बाबीसाठी दर र.रु.42,09,696/- कमी करून दिलेल दर असुन सदरचे दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.42,30,000/- पेक्षा -0.48% ने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३९९ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/११९/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.69/03/2019-20 अन्वये प्रभाग क्र.३ च-होली येथील संत ज्ञानेश्वर व संत नामदेव महाराज यांचे भेटीवर आधारित समुहशिल्पाच्या परिसरात संत ज्ञानेश्वर सृष्टी उभारणेकरिता स्थापत्य विषयक कामे करणेकामी लघुत्तम ठेकेदार मे.म्हाळसा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना मा.आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र.स्था/नि/इमुख्य/२२६/२०२०, दिनांक १६/१२/२०२० व द्वितीय लघुत्तम ठेकेदार मे.चैतन्य एंटरप्रायजेस यांना आदेश क्र.स्था/नि/इमुख्य/२२१/२०२०, दिनांक १६/१२/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेणेस प्रतिबंध करणेस व ३ वर्षाकरीता काळ्या यादीत समाविष्ट करणेचे आदेश निर्गत झाले आहेत. सदर कामासाठी लघुत्तम दोन्ही ठेकेदारांचा समावेश काळ्या यादीत झाल्यामुळे सदर कामासाठी मा.आयुक्तसो यांचे दिनांक २४/१२/२०२० चे मान्य प्रस्तावान्वये तृतीय लघुत्तम ठेकेदार मे.एस.एस.साठे यांना लघुत्तम ठेकेदार(L1) यांनी सादर केलेल्या दरात म्हणजेच १३.६१% कमी दरात काम करणेस तयार आहात का याबाबत विचारणा केली असता त्यांनी L1चे दरात काम करणेची तयार दर्शविली आहे. मे.एस.एस.साठे नि.र.रू.6,45,08,783/- (अक्षरी र.रु.सहा कोटी पंचेचाळीस लाख आठ हजार सातशे त्र्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6,30,62,602/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.6,30,62,602/- पेक्षा 13.61% कमी म्हणजेच र.रु.5,44,79,782 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.14,14,181/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.32,000/- = एकुण र.रु.5,59,25,963 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८४००
विषय क्रमांक – ३९
दिनांक – १०/०२/२०२१
विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे
अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१२०/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.74/04/2019-20 अन्वये प्रभाग क्र.३ च-होली येथील संत ज्ञानेश्वर व संत नामदेव महाराज यांचे भेटीवर आधारित समुहशिल्पच्या परिसरात संत ज्ञानेश्वर सृष्टी तयार करणे या कामासाठी मे.बी.के.खोसे हे लघुत्तम ठेकेदार होते. तथापि बनावट बँक गॅरंटी सादर केले प्रकरणी मे.बी.के.खोसे यांना मा.आयुक्तसो यांचेकडील आदेश क्र.स्था/नि/इमुख्य/ २३२/2020, दिनांक 16/12/2020 अन्वये ३ वर्षाकरीता काळ्यायादीत समाविष्ट केले आहे. त्यामुळे सदर कामासाठी द्वितीय ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे कडून नि.र.रू.6,01,05,753/- (अक्षरी र.रु.सहा कोटी एक लाख पाच हजार सातशे त्रेपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6,01,05,753/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.6,01,05,753/- पेक्षा 5.65% जादा दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2019-20 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा २.१४% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.6,35,01,728/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.6,35,01,728/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०१
विषय क्रमांक – ४०
दिनांक – १०/०२/२०२१
सुचक – मा.अभिषेक बारणे
अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१० दि.२२/०१/२०२१ अन्वये बालभवन महिला व्यायामशाळा,खराळवाडी ही व्यायामशाळा उद्यमनगर मित्र मंडळ या संस्थेस द.म.र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून सेवाशुल्क देऊन ११ महिने कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०२ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांची शिफारस विचारात घेवून -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११ दि.२२/०१/२०२१ अन्वये मनपाच्या वतीने प्रभाग क्र.३० मधील आरक्षण क्र.२२ खेळाचे मैदान चालविले जाते. सदर मैदान सध्या वापरात नाही. कासारवाडी परिसर हा चाळ वजा घरांचा आहे. सदर परिसरातील मुलांना खेळण्यासाठी कोणतेही मैदान उपलब्ध नाही. अभिनव गगन स्पोटर्स क्लब कासारवाडी यांनी शहरातील मुलांना खेळात प्राविण्य मिळविण्यासाठी सदर मैदानाची मागणी केलेली आहे. तरी मुलांच्या सर्वांगीण विकासाकरता, प्रभाग क्र.३० मधील आरक्षण क्र.२२ खेळाचे मैदान अभिनव गगन स्पोटर्स क्लब कासारवाडी या संस्थेस मनपाच्या दरानुसार सकाळी ६.०० ते ८.०० वा. व सायंकाळी ५.०० ते ७.००वा. या वेळेकरिता ५ वर्षाकरिता कराराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०३ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१२ दि.२२/०१/२०२१ अन्वये मनपाच्या वतीने एकूण १२ जलतरण तलाव चालविले जातात, १२ जलतरण तलावापैकी ७ जलतरण तलावांच्या खोली (Depth) कमी असून ५ जलतरण तालावांच्या खोली खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नांव | जलतरण तलावाचे नांव | सध्याच्या खोलींचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | अ | श्री.छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, आकुर्डी | ३.५० फुट X १६ फुट |
| २ | अ | राजर्षी शाहु महाराज जलतरण तलाव, मोहननगर चिंचवड | ३.५० फुट X १४ फुट |
| ३ | ब | कै.वस्ताद बाळासाहेब गावडे जलतरण तलाव, केशवनगर,चिंचवड | ३.५० फुट X १४ फुट |
| ४ | इ | भोसरी जलतरण तलाव,भोसरी | ३.५० फुट X १४ फुट |
| ५ | ग | खिंवसरा पाटील जलतरण तलाव,थेरगाव | ३.५० फुट X १४ फुट |

वरील ५ जलतरण तलावांची खोली जास्त असल्याने, उन्हाळी सिझनमध्ये सर्वच जलतरण तलावांवर पोहणारे क्रीडा प्रेमी, नगारिक, जलतरण खेळाडू यांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. या गर्दीमध्ये नवखे पोहणारे नागरिकांची जास्त संख्या असते. वरील जास्त जलतरण तलावांची खोली जास्त असल्याने सदर ठिकाणी गर्दीमुळे अपघात/जिवित हानी होऊ नये या दृष्टीने वरील ५ जलतरण तलावांची खोली कमी करणे आवश्यक आहे. तरी मनपाच्या आकुर्डी, मोहननगर, चिंचवड, भोसरी, थेरगाव या ५ जलतरण तलावांची खोली (Depth) कमी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८४०४ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१३ दि.२२/०१/२०२१ अन्वये मनपाच्या वतीने सध्या चिंचवड येथे टेबल टेनिस सेंटर करण्यात आलेली आहे. मनपा परिसरात विविध ठिकाणी टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन यांनी मागणी केलेली आहे. मनपा ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत टेबल टेनिस सेंटर सुरु केल्यास शहरात टेबल टेनिस खेळाडू तयार होण्यास मदत होईल. तरी मनपाच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस, तसेच फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत यमुनानगर जलतरण परिसरात टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस व त्याकामी आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०५ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.शैलेश मोरे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१४ दि.२२/०१/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव बोट क्लब व्यायामशाळा आखिल नाधुंन्ज परिषद संभाजीनगर, आकुर्डी ३५ यांना ११ महिने सेवा शुल्क तत्वावर कराराने व्यायामशाळा र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) महापालिकेकडून घेवून चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०६ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग - क्रीडा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१९३/२०२०, दि.३०/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१७ दि.२२/०१/२०२१ अन्वये सेक्टर नं ४ स्पाईनरोड मोशी येथील लॉनटेनिस हार्ड कोर्ट CROSSFIT TENNIS STAR ACDEMY, निगडी प्राधिकरण यांना भाडे कराराने चालविण्यास द्यावयाचे झाल्यास(स.६.०० वा ते दु.१२.०० पर्यंत व सायं ४.०० ते रात्री ९.०० वा. पर्यंत) देता येणे शक्य आहे. महिन्याचे एका कोर्टचे माहे र.रू.५५००/- प्रमाणे व दोन कोर्टचे भाडे र.रू.११,०००/-भाडे तसेच नियमानुसार GST भाडे आकारून संबंधीत व्यक्ती/संस्था/मंडळे यांच्याकडून र.रू.२०,०००/-अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा एफ.डी.आर मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे घेऊन सोबतचे

अटीशर्ती नुसार व लॉनटेनिस कोर्ट भाडे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०७ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग - क्रीडा

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/२०/२०२१, दि.२१/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२० दि.२८/०१/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाअंतर्गत मनपाचे आठ क्षेत्रीय कार्यालयामधील विविध ठिकाणी मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार एकूण ११६ ठिकाणी ओपन जिमचे व ३६ ठिकाणी इनडोअर जिम साहित्य खरेदी करिता एकूण अंदाजे र.रु.२१.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.एकवीस कोटी पन्नास लाख फक्त)इतका खर्च येणार आहे. “क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी” या लेखाशिर्षातून सदरचा खर्च करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय प्रशासनाने तपासून सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०८ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२१ दि.२८/०१/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी येथील डॉ.हेडगेवार क्रीडा संकुल मधील स्केटिंग ग्राऊंड Be the Change या सार्वजनिक संस्थेला ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४०९ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

विषय-मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२२ दि.२८/०१/२१.

विषय क्र.४८ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१०
विषय क्रमांक – ४९
दिनांक – १०/०२/२०२१
विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.संतोष कांबळे
अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/११७/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV1/1-2020-21 अन्वये पिं.चिं. मनपाचे उर्वरित मैलाशुध्दीकरण केंद्रे व पंपीग स्टेशनसाठी एक्सप्रेस फिडरद्वारे अखंडीत वीजपुरवठा करणे व रिंगमेनद्वारे जोडणेकामी आवश्यक व अनुषंगीकामे करणेकामी (टप्पा ३) मे.इंडियन केबल ऍण्ड इलेक्ट्रीकल्स प्रा.लि. यांचेकडुन निविदा र.रु १२,३१,०४,९३५/- वर निविदा दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदारांकडून र.रु.१२,३१,०४,९३५/-पेक्षा -३६.११% कमी या दराने म्हणजेच र.रु.७,८६,५१,७८३/- पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेसतसेच निविदा अटी नुसार भाववाढ कलम लागु असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४११
विषय क्रमांक – ५०
दिनांक – १०/०२/२०२१
विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे
अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२६३/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.31/1/2020-21 अन्वये प्रभाग क्र.६ धावडेवस्ती मधील आरक्षण क्र.४३२ विकसित करणेकामी मे.एन.बी. इन्फ्रास्ट्रक्चरस नि.र.रू.12,82,48,907/- (अक्षरी र.रु.बारा कोटी ब्याऐंशी लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे सात फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.12,66,76,623/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.12,66,76,623/- पेक्षा 3.00% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2020-21 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 12.78% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.12,28,76,324/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.8,32,280/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.7,40,004/- = एकुण र.रु.12,44,48,608/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१२ विषय क्रमांक – ५१
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/कावि/१२१/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पर्यावरण विभागाकडील नि.नो.क्र.03/14/2020-2021 अन्वये पंपीग स्टेशनचा ज्यादा वीज वापराच्या ठिकाणी Energy Saving साठी आवश्यक क्षमतेचे STP करणेकामी (भोसरी स.नं.२१७) मे.डब्ल्यू.टी.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा.लि. नि.र.रू.11,68,45,454/- (अक्षरी र.रु.अकरा कोटी अडूसष्ठ लाख पंच्चेचाळीस हजार चारशे चौपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.11,68,41,457/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.11,68,41,457/- पेक्षा 0.10% कमी म्हणजेच र.रु.11,67,24,616/-+रॉयल्टी चार्जेस र.रु.3997/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/-=एकुण र.रु.11,67,28,613/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१३ विषय क्रमांक – ५२
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/कावि/१२२/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पर्यावरण विभागाकडील नि.नो.क्र.03/15/2020-2021 अन्वये पिं.चिं. इंद्रायणी नदी पुर्नरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत कुदळवाडी- जाधव वाडी भागातुन इंद्रायणी नदीस मिळणा-या नाल्या तील पाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर करणेसाठी आवश्यक कामे करणे ३ महिने प्रायोगिक तत्वावर चालविणे व ५ वर्षाकरीता देखभाल व दु. करणेकामी मे.मरक्युरस वॉटर ट्रिटमेंट (ई) प्रा.लि. नि.र.रू.10,94,03,096/- (अक्षरी र.रु.दहा कोटी चौ-यान्नव लाख तीन हजार शहान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.10,91,20,783/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.10,91,20,783/- पेक्षा 2.90% जादा म्हणजेच र.रु.11,22,85,286/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2823/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.11,22,88,109/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८४१४ विषय क्रमांक – ५३
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३६/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/30/01/2020-21 अन्वये पिंपळे गुरव प्रभाग क्र.२९ मधील शेवंताबाई जगताप मनपा शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.3,72,91,455/- (अक्षरी र.रु.तीन कोटी बहात्तर लाख एक्यान्नव हजार चारशे पंचावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,71,64,005/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,71,64,005/- पेक्षा 20.77% कमी म्हणजेच र.रु.2,94,45,041/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,35,428/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,27,450/- = एकुण र.रु.2,98,07,919/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१५ विषय क्रमांक – ५४
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/१४१/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभाग विभागाकडील निविदा क्र.03/16/2020-21 अन्वये मोशी कचरा डेपोतील जुन्या डंपीग केलेल्या कच-याचे बायोमायनिंग करणेकामी मे.हिंद ॲग्रो ॲन्ड केमीकल्स एकुण र.रु.४३,८०,००,०००/- + प्रत्यक्ष येणारा GST या Lumsum व लघुत्तम दरानेप्राप्त झालेली असून सदर दराने काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१६ विषय क्रमांक – ५५
दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – इ क्षेत्रिय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.इक्षेका/आ-४/कावि/४०/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रीय कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीन चाकी रिक्षा टेम्पो (चार रिक्षा टेम्पो) वाहनचालकासह भाड्याने घेणेबाबत मा. अति आयुक्त यांचेकडील दिनांक 13/8/2021 च्या मंजुर प्रस्तावान्वये निविदा नोटीस क्र.३/२०२०-२०२१ एक वर्षासाठीची निविदा प्रसिध्द करणेत आली होती. दिनांक 8/12/2020 रोजी निविदाचे 1 पाकिट उघडले होते. त्यामध्ये ५ निविदाधारकांनी निविदा भरलेल्या आहेत. तदनंतर निविदा कागदपत्रांची तपासणी केली असता २ अपात्र व ३ पात्र निविदाधारक निश्चित झाले. सदर निविदा कागदपत्रांची तपासणी करून पात्र-अपात्र निविदाधारकांचा तक्ता करून दि.11/01/2021 रोजी निविदाचे दराचे 2 पाकीट उघडले होते. त्यानुसार खाली नमुद केलेल्या निविदाधारकांचे खालिल प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव - | निविदा प्राप्त | टक्के कमी दराने | निविदा दरापेक्षा कमी दिलेला दराची रक्कम | Bid Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री संत फॅसिलिटी सव्हीसेस प्रा लि | पात्र | -13.046 | 1519584 | L1 |
| 2 | अथर्व स्वयंरोजगार औदयोगिक सेवा सहकारी संस्था मर्या | पात्र | -9.090 | 1588705 | L2 |
| 3 | जे के ट्ररिस्ट ट्रान्सपोर्ट | पात्र | 269.372 | 6455064 | L3 |
| 4 | जयराम कन्स्ट्रक्शन | अपात्र | -- | -- | |
| 5 | विश्वगंगा स्वयंरोजगार संस्था | अपात्र | -- | -- | |

मे.संत फॅसिलीटी सव्हीसेस प्रा लि यांनी निविदा दरापेक्षा सर्वात कमी दर र.रू.१५,१९,५८४/- व सेवाशुल्क संस्थेचा नफा ० टक्के दर सादर केला आहे. मा.क्षेत्रिय अधिकारी इ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील इक्षेका/आ/४/कावि/०५/२०२१ दिनांक 15/ 01 /2021 च्या पत्रान्वये दर पृथक्करण सादर करणेबाबत पत्र दिले होते. त्यांनी दि.१५/१/२०२१ रोजी दर पृथक्करण सादर केलेले आहे. दि१९/१/२०२१ चे प्रस्तावान्वये तुलनात्मक दराचा तक्ता तयार करुन दर स्वीकृतीबाबत अंतर्गत लेखा परीक्षण विभागाचा अभिप्राय घेणेकामी सादर केला आहे. अंतर्गत लेखा परीक्षण दि.४/२/२०२१ रोजी चे पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी लघुत्तम निविदाधारक मे.श्री संत फॅसिलीटी सव्हिसेस प्रा लि यांनी दिलेल्या र.रू.15,19,584/- निविदा दरापेक्षा 13.04% कमी या मूळदराची निविदा विभागाने मान्य केलेनुसार व दि.3/2/2021 चे आक्षेप खुलाशाचे अधिनस्त स्वीकृत करणेस हरकत नाही असा अभिप्राय दिलेला आहे. सदर अभिप्रायास मा.अतिरिक्त आयुक्त(2) यांची मान्यता घेणेत आलेली आहे. सबब श्री संत फॅसिलिटी सव्हीसेस प्रा लिया संस्थेकडुन वाहने उपलब्ध करून घेवून त्या उपलब्ध चार वाहनांच्या खर्चास एक वर्षाकरीता र.रू.15,19,584/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख एकोणीस हजार पाचशे चौ-याऐंशी फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम(क) नुसार कार्योत्तर मान्यता देणेची मा.अति.आयुक्त(२) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामास १ वर्षा ऐवजी २ वर्षे मुदत देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१७ विषय क्रमांक – ५६

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – लेखा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३१/कावि/३०/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे कडील पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ/४६७४ दिनांक२९/०१/२०२१ अन्वये सन २०१९-२० ची अंदाजीत संचलनतूट र.रु.३१५.१० कोटी गृहीत धरुन ४० टक्के नुसार पिंपरी चिंचवड मनपाचा संचलनतूटीचा हिस्सा १२६.०४ कोटी इतकी होत आहे. माहे फेब्रुवारी २०२१ अखेर प्रतिमहा र.रु.१०.५० कोटी संचलनतूटीचे द्यावे अशी विनंती केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १३३.५८ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून र.रु.९ कोटी (अक्षरी र.रु.नऊ कोटी फक्त) संचलनतूटीचे सन २०१९-२० च्या अंदाजित संचलनतूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१८ विषय क्रमांक – ५७

दिनांक – १०/०२/२०२१ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/७८/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सन्माननीय पदाधिकारी, सर्वपक्षीय गटनेते, विविध संघटमेचे प्रतिमिधी यांच्या समवेत झालेल्या बैठकीनुसार छत्रपती शिवाजी महाराज समाज प्रबोधन पर्व २०२१ निमित्त शहरात विविध ठिकाणी नेंदणीकृत संस्थांच्या माध्यमातून महानगपालिकेच्या सहकार्याने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात येणार आहे. याकरिता थेट पध्दतीने अंदाजे र.रू.३५ लाख (अक्षरी र.रू.पस्तास लाख फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४१९ विषय क्रमांक – ५८

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव–

स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत नगरसदस्यांचा अभ्यास दौरा माहे मार्च-२०२१ मध्ये जम्मू व काश्मिर येथे आयोजित करावयाचा आहे .सदरचे अभ्यास दौ-यामध्ये शहर स्वच्छता , कचरा विल्हेवाट शाळांमधील स्वच्छता प्रकल्प पर्यटन स्थळावरील स्वच्छता नियोजन इ .बाबत

भेटी द्यावयाच्या आहेत. सदर दौ-यासाठी मा.सदस्य/सदस्या व इ प्रभागातील ४ अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.इ प्रभाग समितीचे मासिक सभेमध्ये ठराव क्र दि. /०२/२०२१ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे .तरी सदरचे अभ्यास दौ-यास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२० विषय क्रमांक – ५९

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नियोजित विविध प्रकल्प व विकास कामांची भूमिपुजने तसेच पूर्णत्वास आलेल्या विविध प्रकल्प व विकास कामांची उद्घाटने व इतर कार्यक्रमांचे आयोजन दि.१५/०२/२०२० रोजी करणेत येणार असल्याचे मा. महापौर यांनी कळविले आहे. त्यानुसार अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले इमारतीच्या दुस-या मजल्यावरील नव्याने तयार करण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे फर्निचर व इतर कामकाज पूर्ण झाले आहे. दि.१५/०२/२०२१ रोजी या सार्वजनिक वाचनालयाचे हि उद्घाटन करण्यात येणार असून सदर नवनिर्मित सार्वजनिक वाचनालय नागरिकांसाठी वाचनासाठी खुले करण्यात येणार आहे. ज्ञान ज्योति सावित्रीबाई फुले सांस्कृतिकभवन इमारतीतील नवनिर्मित सार्वजनिक वाचनालयास “महात्मा जोतीराव फुले“ सार्वजनिक वाचनालय” असे नामकरण करणेत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२१ विषय क्रमांक – ६०

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील अधिका-यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रशासन विभागाकडील प्रशा/११/कावि/१७०/२०२० दि.३०/०३/२०२० नुसार वाहन वाटप धोरणामध्ये पदनामानुसार वाहन वाटप करणेत आली आहेत. त्यातील प्रपत्र अ मध्ये गट ब मधील फिरतीचे काम असणा-या सहाय्यक आरोग्य अधिकारी, जनता संपर्क अधिकारी, समाज विकास अधिकारी, उद्यान अधिक्षक, पशुवैद्यकीय अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी, सुरक्षा अधिकारी, कार्यव्यवस्थापक या पदनामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार प्रशासन विभागाने तातडीने सुधारीत वाहन वाटप धोरण आदेश निर्गमित करावा. नवीन सुधारीत आदेश निर्गमीत होत नाहीत तोपर्यंत प्रशासन/तप/कावि/३१९/२०११ दि.१/७/२०११ मधील वाहन वाटप धोरणात नमूद उपरोक्त अधिका-यांसाठी असलेल्या वाहन वापरासंबंधी असलेल्या धोरणानुसार अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८४२२ विषय क्रमांक – ६१

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि लायन्स क्लब ऑफ पुणे आकुर्डी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांच्या हद्दीमध्ये जागांच्या उपलब्धतेनुसार मनपा हद्दीतील १८ ते ३० वयोगटातील युवक, युवतींसाठी महिला सबलीकरण, कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण प्रकल्प राबविण्यास जागा विनामुल्य महापालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यास तसेच लायन्स क्लब ऑफ पुणे आकुर्डी चरिटेबल ट्रस्ट यांनी या प्रकल्पांतर्गत सहभागी होणा-या लाभार्थी मधिल १८ ते ३० वयोगटातील महिला, मुले, मुली यांना मोफत प्रशिक्षण देवून, रोजगार उपलब्ध करून देण्यास व त्याकरीता आवश्यक मनुष्यबळ न अनुषंगिक खर्च त्यांनी CSR( Corporate Social Responsibility) व क्राउड फंडिंगच्या माध्यमातून उभारून प्रकल्प कार्यान्वीत करण्याल तसेच सावित्रीबाई फुले इमारती मधील तिसरा मजल्यावरील एक हॉल साधारणपणे २०.४२मी x ८.९९मी. जागा मनपामार्फत मोफत उपलब्ध करून देवून कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण प्रकल्प किमान ३वर्षे कालावधीकरीता सुरू करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२३ विषय क्रमांक – ६२

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मे.पिक्सल मोशन अडवरटायजिंग हि जाहिरात संस्था पिंपरी या ठिकाणी आहे. सदर संस्थेस खालील ठिकाणी २० x २० या आकारमानात व महापालिकेत वरील भागात प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त मंजूर दरानुसार होणारे जाहिरात पोटीचे भाडे रक्कम अधिक मनपा रक्कम टप्याटप्याने भरून घेवून व करारनामा करून पुढील निविदा काढून एजन्सी निश्चित होईपर्यंत कालावधीसाठी जाहिरात पध्दतीचे हक्क देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| १ | औंध रावेत बीआरटी रोड मुळा नदी उड्डाण पुला लगत सांगवी पुणे |
| २ | औंध रावेत बीआरटी रोड ढोरे पाटील अंडरपास लगत सांगवी पुणे |
| ३ | जुना औंध सांगवी मुळा नदी पुला शेजारी सांगवी पुणे |
| ४ | बाबूरावजी घोलप कॉलेज लगत चौका शेजारी सांगवी पुणे |
| ५ | फेमस चौक सांगवी पुणे |
| ६ | महाराजा हॉटेल लगत सांगवी पुणे |
| ७ | एम एस काटे चौक नर्मदा गार्डन समोर सांगवी पुणे |
| ८ | फुगेवाडी पुणे रोड दापोडी चौक सीएनजी पंप समोर सांगवी पुणे |
| ९ | चिंचवड आकुर्डी लिंक रोड रेल्वे उड्डाणपुला लगत चिंचवड पुणे |
| १० | भक्ती शक्ती चौक बस चार्जिंग टर्मिनल सिमा भिंती लगत निगडी पुणे |
| ११ | अदित्य बिर्ला हॉस्पीटल शेजारी उड्डाणपुला लगत चिंचवड पुणे |
| १२ | मोरया मंगल कार्यालय समोरील बाजूस चिंचवडगाव लगत चिंचवड पुणे |

| | |
|---|---|
| १३ | रोसवुड  हॉटेल समोरील बाजूस सिमा भिंती लगत थेरगाव पुणे |
| १४ | वाल्हेकरवाडी चिंचवड लिंक रोड चौक चिंचवड पुणे |
| १५ | नविन एच पी पेट्रोल पंप लगत खराळवाडी पिंपरी पुणे |
| १६ | वल्लभनगर एसटी स्टँड समोर पिंपरी पुणे |
| १७ | पिंपरी वाहनतळ क्रॉमा मॉल शेजारील जागेत पिंपरी पुणे |
| १८ | कस्पटेवस्ती चौक स्मशानभूमि समोर पिंपळे निलख पुणे |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२४ विषय क्रमांक – ६३

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

तुळापुर येथे श्री.छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ दरवर्षी फालगुन अमावस्येला बलिदान दिन/ छत्रपती संभाजी महाराजांची पुण्यतिथी म्हणून साजरी केली जाते. या ठिकाणी पिंपरी चिंचवडसह राज्यातील विविध्र भागातून जनता दर्शनासाठी येत असते, ग्रामपंचायतीला सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी अभावी अडचणी येत असतात. तरी छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान दिनानिमित्त तुळापुर ग्रामपंचायतीस महाराजांचे समाधी स्थळाचे ठिकाणी मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हारफुले इ. करिता दरवर्षी र.रू.२,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्यान्नव हजार फक्त) देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२५ विषय क्रमांक – ६४

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा. राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

ड मुख्यालयातील सन २०१९-२०२० चे सुधारित व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षकातील खालील नमुद केलेली नविन विकास विषयक कामे करावयाची आहेत सदर कामांना अंदाजपत्रकात असणा-या तरतूदी कमी असल्याने सदर कांमांच्या तरतूदीमध्ये खालील प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक | | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | आवश्यकते नुसार होणारी | | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | प्रभाग क्र.२६ वाकड येथील समर्थ क़ॉलनी तनिष्क क़ॉलनी व इतर | स्थापत्य विशेष योजना | ३५ | ११२ | १००००० | १०००००० | ० | १०१००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | परिसरामध्ये क्रॉक्रीटीकरणाने रस्ता विकसित करणे | | | | | | | |
| २ | प्रभाग क्र.२६ मधील छत्रपती चौक ते उत्कर्ष चौकापर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे | स्थापत्य विशेष योजना | २१ | ५० | ५००००००० | ० | १००००००० | ४००००००० |
| एकूण रक्कम रूपये | | | | | ५०१००००० | १००००००० | १००००००० | ५०१००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२६ विषय क्रमांक – ६५

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

जुन्या तालेरा हॉस्पिटल पाडुन नविन इमारत बांधणेचे काम सद्यस्थितीमध्ये चालू आहे. सदर इमारतीचे कामासाठी आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार म्हणुन मे.शशी प्रभु अँड असोसिएट्स यांचे देखरेखी खाली ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे मार्फत चालू आहे. सदर कामामध्ये साईट वरील प्राप्त परिस्थितीनुसार जागेवर काम करावे लागल्यामुळे मुळ निविदा रक्कमेमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे विषयांकित कामाच्या सुधारित अंदाज पत्रकास मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामाची मुळ निविदा र.रू.३९,७७,३३,९९७/- (स्थापत्य + विद्युत) निविदा दर १.६०% कमी आहे. निविदा मंजूर दराने र.रू.३९,१३,७०,२५३/- + भाववाढ/भावघट इतक्या रक्कमे पर्यंत काम करून घेणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.२१६७, दि.०७/०२/२०१८ रोजी मंजूरी प्रदान केले आहे. जागे वरील कामानुसार खोदकाम, कॉक्रीट, रिईनफोर्समेंट, विटबांधकाम व फरशी कामात वाढ झाली आहे. या व्यतिरीक्त इमारत चालू करणेच्या दृष्टीने काही निकडीचा व आवश्यक कामे करावी लागत असल्यामुळे स्थापत्य विषयक कामांचा र.रू.२९,५९,२६,७८९/- व विद्युत कामाचा र.रू.१६,७१,३५,४०७/- असा र.रू.४६,३०,६२,१९६/- इतका एकुण सुधारित खर्च होत आहे. सदर रक्कमेवर मंजूर खर्च १.६०% वजा करता र.रू.४५,५६,५३,१९८/- इतका खर्च होत आहे. सदर रक्कमेवर मंजूर खर्च एकुण र.रू.३९,१३,७०,२५३/- वजा करता र.रू.६,४२,८२,९४५/- इतका वाढीव खर्च होत आहे. सबब तरी या वाढीव सुधारित रक्कमेस र.रू.६,४२,८२,९४५/- इतका खर्च +भाववाढ/भावघट इतक्या रक्कमे पर्यत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२७ विषय क्रमांक – ६६

दिनांक – १०/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

वार्ड क्र.४ दिघी येथील आरक्षण क्रं.२/१२२ मध्ये शाळा इमारत बांधणेचे काम सद्यस्थितीमध्ये चालू आहे. सदर इमारतीचे कामासाठी आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार म्हणुन मे. किमया असोसिएट्स यांचे देखरेखीखाली ठेकेदार मे. एस एस साठे यांचे मार्फत चालू आहे. सदर

कामामध्ये साईट वरील प्राप्त परिस्थितीनुसार जागेवर काम करावे लागल्यामुळे मुळ निविदा रक्कमेमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे विषयांकित कामाच्या सुधारित अंदाज पत्रकास मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामाची मुळ निविदा र.रू.१२,४३,७१,५०३/- (स्थापत्य + विद्युत) निविदा दर ५.१५% कमी आहे. निविदा मंजूर दराने र.रू.११,७९,९५,०७४/- + भाववाढ/भावघट इतक्या रक्कमे पर्यंत काम करून घेणेस मा. स्थायी समिती ठराव क्र.६४८७, दि.२२/०१/२०२० रोजी मंजूरी प्रदान केले आहे. जागे वरील कामानुसार खोदकाम व तळमजला, कॉंक्रीट, रिईनफोर्समेंट, यामध्ये वाढ झाली आहे. या व्यतिरीक्त इमारत चालू करणेच्या दृष्टीने काही निकडीचा व आवश्यक कामे करावी लागत असल्यामुळे स्थापत्य विषयक कामांचा र.रू.१५,००,००,०००/- विद्युत कामासह इतका एकुण सुधारित खर्च होत आहे. सदर खर्चातून निविदा दर ५.१५% वजा करता र.रू.१४,२३,०३७०३/- इतका खर्च होत आहे. सदर रक्कमेवर मंजूर खर्च एकुण र.रू.११,७९,९५,०७४/- वजा करता र.रू.२,४३,०८,६२९/- इतका वाढीव खर्च होत आहे. सबब तरी या वाढीव सुधारित रक्कमेस र.रू.२,४३,०८,६२९/- इतका खर्च + भाववाढ/ भावघट इतक्या रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/२८१/२०२१
दिनांक – ११/०२/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.बक्षेका/नि-४/कावि/७८/२०२१ दि.२८/०१/२०२१ विषय क्र.१२ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44

(विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/ 78 /2021 दि. 28/01/2021 लगत) प्रपत्र " अ "

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | निविदा खर्चाची रक्कम (निविदा दरानुसार रक्कम + त्यावरील प्रचलित दराने वस्तु व सेवा कर अदा करावा) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.कमल इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 2/5/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र.१ मधील दिवाबत्ती व्यवस्थेच्या फिडर पिलरची दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 17/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/41/2021 | 19/01/2021 | 892141 | 16.00 %कमी | 749398 |
| 2 | मे.व्ही एस एंटरप्रायजेस | 2/7/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१ मधील दिवाबत्ती व्यवस्थे करीताच्या खराब भुमीगत केबल बदलणे व केबलची देखभाल देखभाल दुरूस्ती व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 17/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/22/2021 | 12/01/2021 | 892774 | 24.20 %कमी | 676723 |
| 3 | मे.व्ही एस एंटरप्रायजेस | 2/11/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र.१ मध्ये दिवाबत्ती व्यवस्थेतील खांबाना व फिडर पिलरला अर्थिंग करणे व सुरक्षितेच्यादृष्टीने विद्युत विषयक कामे करणे. | 17/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/23/2021 | 12/01/2021 | 890664 | 25.11 %कमी | 667018 |
| 4 | मे.सचिन इलेक्ट्रीकल्स | 2/15/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील दिवाबत्ती व्यवस्थे करीताच्या खराब भुमीगत केबल बदलणे व केबलची देखभाल दुरूस्ती व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/24/2021 | 12/01/2021 | 892844 | 28.88 %कमी | 634991 |
| 5 | मे.जे पी ट्राफीक अँटोमेशन प्रा. लि. | 2/18/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र.११ मधील सिग्नलची देखभाल दुरुस्ती करणे. | 11/01/2021 | फक्षेका/नि-4/कावि/42/2021 | 19/01/2021 | 892577 | 18.55 %कमी | 727004 |
| 6 | मे.व्ही एस एंटरप्रायजेस | 2/24/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१२ मधील आवश्यक ठिकाणच्या दिवाबत्ती व्यवस्थे मधील नादुरुस्त खिळन्या दुरुस्त करणे , आवश्यक देखभाल दुरूस्ती व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. | 17/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/25/2021 | 12/01/2021 | 892230 | 21.78 %कमी | 697902 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | मे.जे पी ट्राफीक अँटोमेशन प्रा. लि. | 2/25/2020-21 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत प्रभाग क्र.१ मधील सिग्नलची देखभाल दुरुस्ती करणे. | 11/01/2021 | फक्षेका/नि-4/कावि/43/2021 | 19/01/2021 | 891424 | 18.55 | %कमी | 726065 |
| | | | | | | एकुण | **6244654** | | | **4879101** |

क्षेत्रिय अधिकारी
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**(क्र.बक्षेका/नि-४/कावि/७२/२०२१ दि.२७/०१/२०२१ विषय क्र.१३ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44

विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/ 72 /2021 दि.27 /01/2021 लगत - प्रपत्र " अ "

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | निविदा स्विकृत दर | निविदा खर्चाची रक्कम (निविदा दरानुसार रक्कम + त्यावरील प्रचलित दराने वस्तु व सेवा कर अदा करावा ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.प्रसाद दिलीप राऊत (सु.बे.अ.) | 1/4/2020-21 | प्रभाग क्र.११ मध्ये स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/01/2021 | 4/01/2021 | 824475 | 807175 | 1060 | 17300 | 33.21%कमी | 557472 |
| 2 | मे.खाडे कन्स्ट्रक्शन | 1/7/2020-21 | प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/11/2021 | 11/01/2021 | 749365 | 733665 | 565 | 15700 | 31.53%कमी | 518605 |
| 3 | मे.विवेक कन्स्ट्रक्शन | 1/13/2020-21 | प्रभाग क्र.१३ साईनाथनगर मधील रस्त्यांची दुरूस्ती करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/02/2021 | 4/01/2021 | 597989 | 531989 | 13010 | 66000 | 30.01%कमी | 451349 |
| 4 | मे.एस एस एंटरप्रायजेस | 1/14/2020-21 | प्रभाग क्र.१३ साईनाथनगर मधील पेव्हींग ब्लॉकची दुरूस्ती करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/37/2021 | 18/01/2021 | 749176 | 734926 | 1413 | 14250 | 30.50%कमी | 526437 |
| 5 | मे.पी जे मोटवाणी | 1/15/2020-21 | प्रभाग क्र.१ मोरेवस्ती परिसरातील नाल्याची सन २०२०-२१ साठी स्थापत्य विषयक दुरूस्ती करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/38/2021 | 18/01/2021 | 748005 | 732555 | 1781 | 15450 | 37.01%कमी | 478667 |
| 6 | मे.कविता एंटरप्रायजेस | 1/16/2020-21 | प्रभाग क्र.१ चिखली मधील पेव्हींग ब्लॉकची दुरूस्तीविषयक कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/39/2021 | 18/01/2021 | 748587 | 731987 | 1413 | 16600 | 37.08%कमी | 478579 |
| 7 | मे.पी जे मोटवाणी | 1/17/2020-21 | प्रभाग क्र.१ मध्ये सन २०२०-२१ साठी चेंबर्स दुरूस्तीविषयक कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/40/2021 | 18/01/2021 | 825018 | 803018 | 0 | 22000 | 38.02%कमी | 519711 |
| 8 | मे.एस एस एंटरप्रायजेस | 1/18/2020-21 | प्रभाग क्र.१ मधील रस्त्यावरील चर व खड्डे भरणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/03/2021 | 4/01/2021 | 746426 | 672326 | 15840 | 74100 | 38.99%कमी | 500126 |
| 9 | मे.एस एस एंटरप्रायजेस | 1/19/2020-21 | प्रभाग क्र.१ मध्ये सन २०२०-२१ साठी मोरेवस्ती म्हेत्रेवस्ती सोनवणेवस्ती अंतर्गत भागातील राडारोडा उचलणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/04/2021 | 4/01/2021 | 749899 | 749899 | 0 | 0 | 37.99%कमी | 465012 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | मे.यश एंटरप्रायजेस | 1/22/2020-21 | प्रभाग क्र.१ मधील रामदासनगर व पाटीलनगर येथे चेंबर्स दुरूस्तीविषयक कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/12/2021 | 11/01/2021 | 296643 | 274643 | 0 | 22000 | 33.33%कमी | 205104 |
| 11 | मे.यश एंटरप्रायजेस | 1/23/2020-21 | प्रभाग क्र.१ मधील स्टॉर्म वॉटर व चेंबर्स दुरूस्त करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/15/2021 | 11/01/2021 | 298118 | 276118 | 0 | 22000 | 33.33%कमी | 206088 |
| 12 | मे.कुणाल तात्यासाहेब गायकवाड (सु.बे.अ.) | 1/24/2020-21 | प्रभाग क्र.११ मध्ये मनपाच्या विविध सांस्कृतीक कार्यक्रमांना मंडप व्यवस्था करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/13/2021 | 11/01/2021 | 817734 | 817734 | 0 | 0 | 31.00%कमी | 564236 |
| 13 | मे.विवेक कन्स्ट्रक्शन | 1/26/2020-21 | प्रभाग क्र.१३ साईनाथनगर मध्ये फुटपाथ दुरूस्तीची कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/05/2021 | 4/01/2021 | 299314 | 285064 | 283 | 14250 | 29.99%कमी | 214106 |
| 14 | मे.विवेक कन्स्ट्रक्शन | 1/27/2020-21 | प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मध्ये फुटपाथ दुरूस्तीची कामे करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/06/2021 | 4/01/2021 | 299545 | 285295 | 283 | 14250 | 29.99%कमी | 214268 |
| 15 | मे.विवेक कन्स्ट्रक्शन | 1/28/2020-21 | प्रभाग क्र.१३ यमुनानगर येथील डांबरी रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/07/2021 | 4/01/2021 | 298738 | 288388 | 7732 | 10350 | 29.00%कमी | 222837 |
| 16 | मे.विवेक कन्स्ट्रक्शन | 1/29/2020-21 | प्रभाग क्र.१३ साईनाथनगर येथील डांबरी रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/08/2021 | 4/01/2021 | 299157 | 288807 | 7732 | 10350 | 29.01%कमी | 223106 |
| 17 | मे.तुषांत चौधरी (सु.बे.अ.) | 1/30/2020-21 | प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण येथील डांबरी रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 21/12/2020 | फक्षेका/नि-4/कावि/14/2021 | 11/01/2021 | 299787 | 289437 | 7732 | 10350 | 21.00%कमी | 246737 |
| | | | | | | | | | | | एकुण | 6592440 |

क्षेत्रिय अधिकारी
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**(क्र.स्था/नि/उद्यान/कावि/३०/२०२० दि.०२/०२/२०२१ विषय क्र.१५ चे लगत)**

प्रपत्र अ ( १ ते ६ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | स्विकृत दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| 1 | मे.शिवम एंटरप्रायजेस | 3/01/2020-21 | पिंपरी चिंचवड मनपाचे अ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत वृक्षरोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | 18/12/2020 | स्था/नि/उद्यान/137/2020 | 18/12/2020 | १०५९०३४ | ९७४४४२ | ८४५९२ | 40.70 % कमी |
| 2 | मे.मयुर सुनिल बोराटे | 3/03/2020-21 | पिंपरी चिंचवड मनपाचे क क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत वृक्षरोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | 30/09/2020 | स्था/नि/उद्यान/96/2020 | 30/09/2020 | १२८२०२९ | ११९८५६५ | ८३४६४ | 41.04 % कमी |
| 3 | मे.शिवम एंटरप्रायजेस | 3/04/2020-21 | पिंपरी चिंचवड मनपाचे ड क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत वृक्षरोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | 15/12/2020 | स्था/नि/उद्यान/135/2020 | 15/12/2020 | ७१२९२१ | ६४०२६५ | ७२६५६ | 40.26 % कमी |
| 4 | मे.मयुर सुनिल बोराटे | 3/06/2020-21 | पिंपरी चिंचवड मनपाचे फ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत वृक्षरोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | 30/09/2020 | स्था/नि/उद्यान/97/2019 | 30/09/2020 | १०५७५७९ | ९७२९८७ | ८४५९२ | 40.32 % कमी |
| 5 | मे.मयुर सुनिल बोराटे | 3/07/2020-21 | पिंपरी चिंचवड मनपाचे ग क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत वृक्षरोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | 30/09/2020 | स्था/नि/उद्यान/98/2019 | 30/09/2020 | ६२८१४४ | ५६३५८७ | ६४५५७ | 40.50 % कमी |
| 6 | मे.शिवम एंटरप्रायजेस | 3/08/2020-21 | पिंपरी चिंचवड मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत वृक्षरोपणासाठी खड्डे खोदणे व माती भरणे | 15/12/2020 | स्था/नि/उद्यान/136/2019 | 15/12/2020 | ७९८९४९ | ७२८५६९ | ७०३८० | 40.44 % कमी |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

**(क्र.हक्षेका/लेखा/कावि/०७/२०२१ दि.०३/०२/२०२१ विषय क्र.२० चे लगत)**

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ह क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी -34

प्रपत्र " अ "

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ऍंड इलेक्ट्रिकल्स | 04/18-2018-2019 | ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सांगवी उपविभागांतर्गत प्रभाग क्र. 31 व 32 मधील मनपा तर्फे सन 2018-2019 मध्ये साजरे करण्यास येणा-या ,पुण्यतिथी, उदघाटन समारंभ भूमीपूजन व इतर समारंभासाठी ध्वनिक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणे. | 15/02/2019 | हक्षेका/वि/कावि/24/2019 | .30/07/2019 | 795070 | -1.17% |
| 2 | मे.अबान इलेक्ट्रिक वर्क्स | 04/23-2018-2019 | कासारवाडी उपविभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलाव विद्युतीकरणाचे नुतनीकरण करणे (सन 2018-2019) | 20/12/2019 | हक्षेका/लेखा/कावि/02/2020 | 22/01/2020 | 401577 | -5.00% |

सही/-
कार्यकारी अभियंता(विदयुत)
ह क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका